REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X

VOLUME - 8 | ISSUE - 5 | FEBRUARY - 2019

# प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये जीवनकौशल्ये विकसनात येणाऱ्या अडचणी व उपाययोजनांचा अभ्यास

**श्री. दिपक माळी**
**संशोधक विद्यार्थी.**

## ➢ प्रास्ताविक :-



विद्यार्थ्यांना सर्वांगीण विकास साधण्यासाठी प्रयत्न होत आहेत. अभ्यासक्रमाच्या पातळ्यावंरून सर्वंकष स्वरूपात बदल होत आहेत. पाठ्यपुस्तकांतील बदलांची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी शिक्षकांना प्रशिक्षण दिले जाते. सध्या बालकेंद्रित अध्ययन-अध्यापन प्रक्रियेच्या माध्यमातून शिक्षण दिले जाते.आज जगातील सर्वच प्रगत देशांमध्ये प्राथमिक शिक्षण मोफत व सार्वत्रिक आहे. प्राथमिक शिक्षण ही एक प्रत्येक मुलाची मुलभूत व अत्यावश्यक गरज आहे. म्हणून आपल्या भारत देशानेही भारतीय राज्यघटनेच्या ४५ व्या कलमानुसार प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीच्या केले आहे. आपल्या देशाला १९६० पर्यंत मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचे उद्दिष्ट साध्य करावयाचे होते परंतु अनेक प्रकारच्या अडचणींमुळे अपेक्षित प्रमाणात साध्य झाले नाही.

औपचारिक शिक्षणात विद्यार्थ्यांनी स्वानुभवातून शिकावे यासाठी जीवनोपयोगी व जीवन जगण्यास उपयोगी पडणारे अध्ययन अनुभव देणे आवश्यक आहे. म्हणून विविध संस्थांमधील अधिकारी वर्ग व शिक्षकांना आंतरराष्ट्रीय स्तरावर युनिसेफच्या मदतीने जीवन कौशल्ये शिक्षण प्रशिक्षण देण्यात आले. हे प्रशिक्षण घेतलेल्या तज्ञांच्या परिषद, पुणे या संस्थेने जीवन कौशल्य शिक्षण मार्गदर्शिका, तयार केली. जीवन कौशल्य शिक्षण प्रशिक्षण ही शिक्षकांना देण्यात आले. त्यामुळे जीवन कौशल्ये शिक्षण देवून विद्यार्थ्यांमध्ये जीवन कौशल्ये विकसित करण्याची जबाबदारी साहजिकच शिक्षकांवर आली.आपण जीवन कौशल्य शिक्षण म्हणजे काय ? ते पाहू. खाली दिलेल्या व्यांख्यावरून आपणास जीवन कौशल्ये शिक्षण विषयक संकल्पना अधिक स्पष्ट होईल.

## ➢ जीवन कौशल्ये शिक्षण व्याख्या :-

१. जीवनाच्या वाढ व विकासाच्या महामार्गावर प्रगती करण्याच्या दृष्टीने अध्ययन कर्त्यांच्या क्षमतांचा योग्य विकास करणे म्हणजे जीवन कौशल्य शिक्षण.
२. जीवन कौशल्यांचे शिक्षण म्हणजे व्यक्तींच्या स्वत:च्या मानसिक व शारीरिक सर्वोत्कृष्ट क्षमतांचा वापर करून त्याच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगिण विकास करणे होय.

जागतिक आरोग्य संघटनेने (who-world Health Organisation ) १९९७ दहा मूलभूत जीवन कौशल्ये सांगितली आहेत. ती जीवन कौशल्ये खालील प्रमाणे

१. स्व:ची जाणीव
२. समानुभूती
३. समस्या निराकरण
४. निर्णय क्षमता
५. परिणामकारक संप्रेषण
६. व्यक्तिव्यक्तिमधील सहसंबंध
७. सर्जनशील विचार

८. चिकित्सक विचार
९. भावनांचे समायोजन
१०. ताणतणावांचे समायोजन

आजचा विद्यार्थी हा उद्याचा समाजातील जबाबदार नागरिक होणार आहे. मानवी जीवन व्यवहार हे समाजात मिसळून करावे लागतात. मानव हा समाजशील प्राणी आहे. त्याला आपल्या अनेक दैनंदिन गरजांची पूर्ती करावी लागते. त्यासाठी तो ज्या समूहात राहतो त्या समूहातील इतरांबरोबर कसे वागावे ? कसे बोलावे ? इतरांच्या सुख-दु:खात कसे सहभागी व्हावे ? कोणत्या प्रसंगी कोणत्या भावना प्रतिक्रिया व्यक्त कराव्यात ? आपले वर्तन , आचार , विचार कसे असावेत ? यासाठी त्याला जीवन व्यवहाराचे ज्ञान असणे आवश्यक असते. प्रत्येक व्यक्ती जन्मापासून काहीतरी नवीन शिकत असते. म्हणून जीवन व्यवहार कसे पार पाडावेत ? याचे ज्ञान किंवा माहिती प्राप्त करण्यासाठी त्यास जीवन कौशल्ये आत्मसात करणे गरजेचे असते.

जीवन कौशल्य शिक्षण हा अविभाज्य घटक आहे. परंतु वैयक्तिक शालेय कार्ये व नियमित अध्यापन यामुळे जीवन कौशल्य शिक्षणांकडे दुर्लक्ष होते. त्यामुळे जीवन कौशल्य विकसनात अडचणी येतात. जीवन कौशल्य शिक्षणात येणाऱ्या अडचणी कोणत्या ? व येणाऱ्या अडचणींवर कोणते उपाय-योजना करता येतील ? याचा शोध घेण्यासाठी संधोकाने प्रस्तुत संशोधन कार्य हाती घेतले आहे.

- **संशोधनाची गरज :-**शिक्षकांना विद्यार्थ्यांमध्ये जीवन कौशल्ये विकसित करताना येणाऱ्या अडचणी व त्या अडचणींवर करावयाच्या उपाययोजना संबंधी शिक्षकांची मते अजमावणे आवश्यक वाटले . शिक्षकांना जीवन कौशल्य शिक्षणाची गरज व महत्व पटणे आवश्यक आहे. शिक्षकांना जीवन कौशल्य शिक्षणाचे महत्व पटले तर शिक्षक जीवन कौशल्यांचा गांभीर्याने विचार करतील व ही जीवन कौशल्ये विद्यार्थ्यांमध्ये प्रभावीपणे विकसित करतील. म्हणून संशोधकस सदर संशोधन समस्येवर संशोधन करण्याची गरज वाटली.

- **संशोधन समस्येचे शीर्षक :-**

प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये जीवनकौशल्ये विकसनात येणाऱ्या अडचणी व उपाययोजनांचा अभ्यास.

- **संशोधनाची उद्दिष्टे :-**

१. जीवन कौशल्ये शिक्षण विषयक कौशल्यांची सद्य:स्थितीतील पातळी अभ्यासणे.
२. जीवन कौशल्ये विकसनात येणाऱ्या अडचणी शोधून उपाय सुचविणे.
३. जीवन कौशल्ये विकसनासाठी सुचविलेल्या उपायांची परिणामकारकता अभ्यासणे.

- **संशोधनाचे महत्व :-**प्राथमिक स्तरावरील जीवन कौशल्ये शिक्षणामधून विकसित करावयाची दहा जीवन

कौशल्य या विषयीची माहिती शिक्षकांना होणार आहे. युनिसेफने मार्गदर्शिका केलेल्या या जीवन कौशल्याशिक्षण देण्यामागील अपेक्षा कोणत्या आहेत. याची ही माहिती शिक्षकांना होण्यासाठी या संशोधनाचे महत्व आहे.प्राथमिक शाळेत जीवन कौशल्ये शिक्षण देताना शिक्षकांना व मुख्याध्यापकांना अनेक अडचणी जाणवतात. या अडचणी कोणत्या आहेत? त्या समस्येचे निराकरण कसे करता येईल ?. हे या संशोधनामुळे शिक्षकांना व मुख्याध्यापकांना समजेल.

- **संशोधनाची व्याप्ती व मर्यादा:-**प्रस्तुत संशोधनात पुणे शहरातील महानगरपालिका क्षेत्रातील प्राथमिक शाळांमधील इ. ३ री ते इ. ४ थी च्या विद्यार्थ्यांमध्ये जीवन कौशल्ये शिक्षणाचा विचार करण्यात आला आहे.
- **संशोधन पद्धतीची निवड :** संशोधकाने प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये जीवन कौशल्ये विकसनात येणाऱ्या अडचणी व उपायोजनांचा अभ्यास याचा अभ्यास करण्यासाठी सर्वेक्षण पद्धतीचा वापर केला आहे.
- **संशोधनासाठी नमुना निवड :-**संशोधकाने संशोधनासाठी पुणे शहरातील महानगरपालिका क्षेत्रातील एकूण १५० प्राथमिक शाळांचा संशोधनात समावेश केला आहे. मराठी माध्यमाच्या प्राथमिक शाळांतील इयत्ता ४ थी या इयत्तेस अध्यापन करणाऱ्या शिक्षकांचा समावेश सदर संशोधनात करण्यात आला आहे.
- **संशोधन साधन व तंत्राची निवड :-**सदर संशोधनाचे स्वरूप व उद्दिष्टे लक्षात घेऊन संशोधकाने शिक्षकांसाठी प्रश्नावली या साधनाची व विद्यार्थ्यांसाठी मुलाखत या तंत्राची निवड केली आहे.

## ➢ निष्कर्ष :

१. विद्यार्थ्यांची परिपक्वता व कौशल्ये संपादनास अनुकूल मानसिकतेचा विचार करून जीवन कौशल्ये शिक्षणाचा अंतर्भाव शालेय शिक्षणात केलेला आहे असे म्हणणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण ७५ टक्के आहे.

२. प्राथमिक स्तरावरील इयत्ता ३ री व ४ थी च्या विद्यार्थ्यांना जीवन कौशल्य शिक्षण देताना अभ्यासक्रमांच्या पाठ्यपुस्तकांत दिलेली जीवनकौशल्य पुरेसी आहेत असे म्हणणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण ७७ टक्के आहे हे प्रमाण जास्त आहे.

३. जीवन कौशल्ये शिक्षणाचा वैशिष्ट्यपूर्ण दृष्टिकोन हा विद्यार्थ्यांना जीवनोपयोगी ज्ञान व माहिती , व्यक्तिमत्वाच्या सर्वांगीण विकासास वाव त्यांना समाजोपयोगी शिक्षण देऊन अष्टपैलू विद्यार्थी सोडविणे हा आहे. असे म्हणणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण ७० टक्के आहे.

४. जीवन कौशल्य शिक्षणाविषयक शिक्षकांना अध्यापनासाठी उपयुक्त ठरणारी मार्गदर्शिकेमध्ये देण्यात आलेली कौशल्ये, चित्रे, स्पष्टीकरण, उदाहरणे व मूल्यमापन या बाबींचा मोठ्या प्रमाणात उपयोग होतो. असा प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण ७४ टक्के आहे. हे प्रमाण विचारात घेण्यासारखे आहे बहुतांशी शिक्षकांना याचा चांगला उपयोग होतो.

५. जीवन कौशल्य शिक्षणासाठी समाविष्ट जीवन कौशल्ये विकसित करण्यासाठी मार्गदर्शिकेत पुरेशा प्रमाणात तरतूद केलेली आहे. असा प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण ९३ टक्के आहे. यावरून बहुतांशी जीवन कौशल्ये दृढीकरणाची तरतूद केलेली आहे असे दिसून आले.

६. जीवन कौशल्ये शिक्षण मार्गदर्शिकेतील जीवन कौशल्ये, भाषा, चित्रे, आशय व मूल्यमापन पद्धती ही वयोगटानुरूप आहे असे ८८ टक्के शिक्षकांना वाटते.

७. प्राथमिक शाळा स्तरावर दिलेल्या जीवन कौशल्य शिक्षण मार्गदर्शिकेतही आशय परिपूर्ण आहे असा प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण ६८ टक्के आहे.जीवन कौशल्य शिक्षण देण्यासाठी जीवन कौशल्य शिक्षण मार्गदर्शिकेत दिलेल्या चित्रे, आकृत्या यांचा आवश्यक तेथे योग्य वापर केलेला आहे. असा प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण ८६ टक्के आहे.

८. जीवन कौशल्ये क्रमांक ४,६,७, ही जीवन कौशल्ये ही अभ्यासक्रमातून साध्य होतात असे प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण ९५ टक्के आहे.

९. जीवन कौशल्ये विकसनाशी सुसंगत दैनंदिन स्वाध्याय दिले जातात असा प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण ६८ टक्के आहे.जीवन कौशल्यांसंबंधी विविधता मोठ्या प्रमाणात आहे असा आहे. असा प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण ७० टक्के आहे.

१०. जीवन कौशल्ये विकसनासाठी कार्यपद्धतीच्या निरीक्षणातून अपेक्षित बदल दिसून न आल्यास जीवन कौशल्ये विकसन उपचारात्मक कार्यक्रमांची सोय केलेली नाही. असा प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांची प्रमाण १७ टक्के आहे.

११. जीवन कौशल्यांचा विकास करण्यासाठी पालकांचे सहकार्य मिळते असा मिळते असा प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण ७ टक्के आहे. जीवन कौशल्ये विकासासाठी पालक पूर्णतः लक्ष देत नाहीत.

१२. जीवन कौशल्ये शिक्षणासाठी दिलेले प्रशिक्षण पुरेसे होते असा प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण ५४ टक्के आहे. शिक्षकांना देण्यात येणारे प्रशिक्षण जीवन कौशल्ये विकासासाठी उपयोगी ठरते.प्रशिक्षण अजिबात पुरेसे नाही असा प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण ४० टक्के आहे.

१३. शिक्षकांना प्रशिक्षणात विषय अध्यापनासाठी मार्गदर्शन पूर्णपणे केले असा प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण ४५ टक्के आहे, प्रशिक्षणामध्ये जीवन कौशल्यनिहाय अध्यापनासाठी मार्गदर्शन अंशतः केले जाते असा प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण ४८ टक्के आहे.

१४. प्रशिक्षण पुरेसे होण्यासाठी गटचर्चा व त्यावर मार्गदर्शन केले जावे असा प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण ४९ टक्के आहे. हे प्रमाण बरेच आहे. शिक्षकांनी आपले मत व्यक्त केल्याप्रमाणे प्रशिक्षणात गटचर्चा व आवश्यक मार्गदर्शन यावर भर दिल्यास प्रशिक्षण चांगले होण्यासाठी मदत होईल.

१५. जीवन कौशल्ये विकसित करण्यासाठी दिलेले स्वाध्याय व कृती विद्यार्थ्यांच्या स्वयंअध्ययनाला पूरक आहेत असा प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण ६६ टक्के आहे. यावरून जीवन कौशल्ये विकसित करण्यासाठी दिलेले स्वाध्याय व कृती अतिशय उपयुक्त आहेत हे दिसून येते.

## ➢ शिफारशी :

१. पाठ्यपुस्तकामध्ये विविध पाठामध्ये जीवन कौशल्य शिक्षण व व्यवहाराची सांगड मोठ्या प्रमाणात घालावी
२. सर्वच शिक्षकांना जीवन कौशल्य शिक्षणाचे प्रशिक्षण द्यावे
३. जीवन कौशल्ये शिक्षणात विद्यार्थ्यांची क्षमता व कुवतीबरोबरच विद्यार्थी वयोगट व परिपक्वता यांचा विचार केला जावा
४. पाठ्यपुस्तकातून जीवनशिक्षण कौशल्यांबाबत जीवनोपयोगी ज्ञान व माहिती व समाजोपयोगी शिक्षण देणारे पाठ समाविष्ठ करावेत
५. शालेय परिसर व पाठ्यपुस्तकांच्या अध्यापनात व सहशालेय उपक्रमांच्या माध्यमातून शिक्षकांनी जीवनकौशल्ये शिक्षण द्यावे
६. जीवन कौशल्यांच्या मांडणीत आणखी सलगता आणण्याचा प्रयत्न करावे.

७. प्राथमिक स्तरावर अभ्यासक्रमात अंतर्भूत केलेली जीवन कौशल्यांचे दृढीकरण शिक्षकांद्वारे करण्यात यावे. जीवन कौशल्यांचे दृढीकरण केल्याने विद्यार्थ्यांच्या अंगी जीवन कौशल्यांचा विकास होतो. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगिण विकास होण्यास मदत होईल.

८. जीवन कौशल्ये शिक्षण मार्गदर्शिका तयार करताना विद्यार्थ्यांच्या वयानुरूप , क्षमतेनुरूप भाषा, चित्रे आशय व मूल्यमापन पद्धती यांचा योग्य विचार करावा.

## ➢ संदर्भ सूची

१) आगलावे ,प्रदीप. (२०००). संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे. नागपूर : विद्या प्रकाशन.

२) पारसनिस हेमलता (२००६) शैक्षणिक संशोधन नमुना निवड, नित्यनुतन प्रकाशन पुणे.

३) पंडीत, बन्सीबिहारी. (२००७). शिक्षणातील संशोधन. पुणे : नित्यनूतन प्रकाशन.

४) बापट, भा. गो. (१९८८). शैक्षणिक संशोधन. (आवृत्ती तिसरी). पुणे : नूतन प्रकाशन.

५) भिंताडे वि.रा (२००६) शैक्षणिक संशोधन पध्दती, पुणे नित्यनुतन प्रकाशन.

६) मुळे रा.श व उमाठे वि.तु. (१९८७) शैक्षणिक संशोधनाची मुलतत्त्वे, नागपूर महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मीती मंडळ.

संपादक . म.रा.शै.सं व प्र. परिषद (२०१४) जीवनकौशल्य प्रशिक्षण अभ्यासक्रम व हस्तपुस्तिका पुणे (विद्या परिषद)